# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in


जा.क्र.बार्टी/अधिछात्रवृत्ती विभाग /BANRF/२१-२२/ १०८४ दिनांक :०२/०३/२०२२

**प्रति,**

**उपोषण कर्ते विद्यार्थी,**
**BANRF-२०१९ व २०२०**

**विषय:** BANRF-२०१९ व २०२० च्या ५०९ पैकी उर्वरीत १०९ संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन अधिछात्रवृत्ती देण्यात यावी, या मागणीकरिता दि. २८/०२/२०२१ पासून आमरण उपोषणास असल्याबाबत.

**संदर्भ:** १) या कार्यालयाचे पत्र क्र.बार्टी/अधिछात्रवृत्ती /BANRF/२१-२२/८८३ दि. १७/०२/२२
२) जा या कार्यालयाचे पत्र क्र.बार्टी/अधिछात्रवृत्ती /BANRF/२१-२२/९०३ दि१८/०२/२२
३) उपोषणकर्ते यांचे प्राप्त निवेदन क्र.३०७७ दिनांक २५/०२/२०२२ .
४) मा.मंत्री महोदय यांचे दि.०१/०३/२०२२ रोजीचे tweet.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये कळविण्यात येते कि, संदर्भ क्र. १ आणि २ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) - २०१९ व २०२० करिता सरसकट सर्व विद्यार्थ्यांची निवड करणेबाबत केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने, कोविड-१९ ची परिस्थिती पाहता विशेष बाब म्हणून सहानुभूती पूर्वक विदार्थ्यांना फेलोशिप मिळणेबाबत शासन स्तरावरून उचित निर्णय घेण्याची विनंती केली आहे आणि त्या संबंधित पत्राची प्रत आपण विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे. तथापि संदर्भ क्र. ३ अन्वये प्राप्त निवेदनात BANRF-२०१९ व BANRF-२०२० करिता ५०९ पैकी १०९ विद्यार्थ्यांची निवड करून निवड यादी बार्टी च्या संकेतस्थळावर प्रकाशित होणार नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरू राहणार असल्याचे नमूद केले आहे. त्यानुषंगाने उपोषणकर्ते संशोधक विद्यार्थी यांचे प्रतिनिधी सोबत दि.२८ फेब. २०२२ रोजी बार्टी कॉन्फरन्स हॉल येथे चर्चा करण्यात आली आणि पुढील मा.नियामक मंडळाच्या बैठकीत विषय प्रस्तावित करण्यात येईल याबाबत आपणास कळविले आहे.

याविषयी संदर्भ क्र. ४ अन्वये मा.मंत्री महोदय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांनी त्यांच्या अधिकृत tweeter खात्यावरून दि. ०१/०३/२०२२ रोजी केलेल्या tweet वरून BANRF-२०१९ व BANRF-२०२० करिता १०९ विद्यार्थ्यांच्या फेलोशिप बाबत सकारात्मक भूमिका दर्शवली आहे. तरी आपणास विनंती करण्यात येते कि, शासन स्तरावरून प्राप्त आदेशानुसार आपणास फेलोशिप देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.सबब शासनाच्या सकारात्मक भूमिकेची दखल घेवून आपण आपले उपोषणापासून परावृत्त व्हावे.

**मा.महासंचालक यांचे मान्यतेने**

(उमेश सोनावणे)
**विभाग प्रमुख**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था, पुणे**

प्रत माहितीस्तव:१ मा.अपर मुख्य सचिव,सा.न्या. व वि.स.विभाग,मंत्रालय,मुंबई माहितीस्तव सविनय सादर
२. मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन , पुणे उचित कार्यवाही स्तव

०१(
१) [illegible]

१) आश्विनी आम्रुला रणदिवे A.Randive

२) उज्वला भिमराव मगर U.B.Magar

३) आम्रपाली मधुकर वाघमारे Aurfeel

४) शितल राजू देहाडे Dehade

5) अनुपम सोनाळे Anupam